आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ७२ वा ● बुधवार दि. ०७ ऑगस्ट २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## पारधी समाजाच्या विविध योजनांसाठी २० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई, : मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील इच्छुक लाभार्थ्यांनी विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रासह २० ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मुंबई यांनी केले आहे. जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमा अंतर्गत पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येतात. सन २०२४-२०२५ करिता जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यासाठी अनुदान उपलब्ध झाले आहे. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई कस्तुरबा क्रॉस रोड न. २, कस्तुरबा महानगरपालिकेची मराठी शाळा क्र. २ सभागृह हॉल, तळमजला, बोरिवली पूर्व, मुंबई या पत्त्यावर अर्ज करावेत, असे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## दोन राष्ट्रगीतांचे जनक ; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर



आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली.

वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबद्द्ल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते.

रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला.

बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**




## 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' योजनेसाठी जास्तीत जास्त महिलांची नोंदणी करा - विभागीय आयुक्त डॉ.निधी पाण्डेय

यवतमाळ, (जिमाका) : शासनाने महिलांसाठी 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' योजना सुरु केली आहे. महिलांच्या आर्थिक उत्थानासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त महिलांची नोंदणी करा, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ.निधी पाण्डेय यांनी केल्या. विश्रामगृह उमरखेड येथे आयुक्तांनी विविध विषयांचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी सदर सूचना केल्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, अपर जिल्हाधिकारी अनील खंडागळे, उपायुक्त शामकांत म्हस्के, उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, नगरपालिका प्रशासनचे सहाय्यक आयुक्त निलेश जाधव, तहसीलदार आर.यु.सुरडकर, मुख्याधिकारी महेश जामनोर आदी उपस्थित होते. विभागीय आयुक्तांनी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसह मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, सैनिक हो तुमच्यासाठी, एक हात मदतीचा- दिव्यांगाच्या कल्याणाचा आदी योजना, उपक्रमांचा देखील आढावा घेतला. सर्वसामान्य नागरिकांना



दिलासा देणाऱ्या या योजना आहेत. विभागात या योजना, उपक्रमांची चांगल्या पद्धतीने अंमलबजावणी करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना सामावून घ्यावे असे, आयुक्तांनी सांगितले. बैठकी नंतर आयुक्तांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयास भेट दिली. या ठिकाणी महसूल संवर्गातील कार्यरत तथा सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या महसूल सप्ताहांतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ मंजूरी पत्रांचे वितरण केले. उमरखेड विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राचे विभाजन, मतदान केंद्राची इमारत, मतदान केंद्राचे नांव बदलणे तसेच नवीन मतदार नोंदणी, मतदार नावाची दुरुस्ती करणे ईत्यादी विषयाबाबत देखील आढावा घेतला. शे.तनवीर शे.मुबीन, अंजली रामराव निरडवार, फिजानाज शे.मुमताज या दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ मंजूरी पत्राचे वितरण करण्यात आले.

उमरखेड नजीक असलेल्या सुकळी येथे मनोहर शिवराम वानखेडे हे शेतकरी गेल्या काही वर्षांपासून उत्तमप्रकारे रेशीम शेती करत आहे. विभागीय आयुक्त डॉ.निधी पाण्डेय यांनी त्यांच्या रेशीम शेतीस भेट देऊन पाहणी केली. या शेतकऱ्याने एक एकर क्षेत्रात तुतीची लागवड केली आहे. प्रत्येक वर्षी ते रेशीम कोषाच्या एकून चार बॅच घेतात. यातून वर्षाला साधारणपणे २ लाख ५० हजार रुपयांचे उत्पन्न होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

विभागीय आयुक्तांनी आर्णी येथे दिग्रस मार्गानजीक अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेत पिकांची पाहणी केली. गेले काही दिवस सतत पाऊस होत असल्याने लगतच्या नाल्याला पुर येऊन निशाद काटपिलवार व रंजना काटपिलवार तसेच रियाज शेख हे वाहत असलेल्या शेत पिकांचे नुकसान झाले आहे. या पिकांची पाहणी करत शेतकऱ्यांशी आयुक्तांनी संवाद साधला.

## बांगलादेशात अडकलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्याकडून उपाययोजना

मुंबई, : बांगलादेशातील



नागरी अशांततेच्या पार्श्र्वभूमीवर तेथे अडकलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि मायदेशात त्यांच्या परतीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाची पावले उचलली आहेत. या विद्यार्थ्यांना तातडीची मदत उपलब्ध होणे आणि त्यांच्या भारतात परतण्यासंदर्भातील आवश्यक कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधला आहे.

बांगलादेशातील अशांततेमुळे परदेशी नागरिकांच्या, विशेषतः अशांत भागात अडकलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्र्न निर्माण झाला आहे. त्या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तिथे शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले आहे.

## जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा आज लातूर दौरा

लातूर, (जिमाका) : आजी, माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबित यांच्या अडचणी सोडविण्यासाठी ७ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता लातूर तहसील कार्यालय येथे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व कल्याण संघटक यांचा दौरा आयोजित केला आहे. तरी सर्व आजी, माजी सैनिक, विधवा व त्यांच्या अवलंबितांनी या दौऱ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढेर (नि.) यांनी केले आहे.

## महसूल पंधरवडा अंतर्गत १० ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'सैनिक हो तुमच्यासाठी' उपक्रम

लातूर, (जिमाका) : महसूल विभागामार्फत राज्यात १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट२०२४ दरम्यान महसूल पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत १० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'सैनिक हो तुमच्यासाठी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील माजी सैनिक, विधवा व त्यांच्या अवलंबितांच्या महसूल विभागाशी संबंधित अडीअडचणी सोडविण्यात येणार आहेत. तरी ज्यांची तक्रार असेल, त्यांनी अर्ज व संबंधित कागदपत्रासह या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी ३० ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये मुलांची १३ व मुलींची १२ अशी एकूण २५ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वसतिगृह प्रवेशाचे अर्ज स्वीकारण्यासाठी सन २०२४-२५ पासून https://hmas.mahait.org हे नवीन वेबपोर्टल विकसित करण्यात आले आहे. तरी विद्यार्थ्यांनी या वेबपोर्टलवर ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नवीन वेबपोर्टलचा वापर करून व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी प्रवेशाचे वेळापत्रक, प्रवेशासाठी नियम, अटी व शर्ती यांची माहिती घेवून ऑनलाईन अर्ज भरू शकतात. शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळविण्यासाठी जिल्ह्यात व्यावसायिक पदवी, पदविका प्रथम वर्षात, पदव्युत्तर प्रथम वर्षात तसेच थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरता येईल. प्रवेश अर्ज भरण्यासाठी व्यावसायिक महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ३० ऑगस्ट, २०२४ पर्यंत मुदत देण्यात आलेली आहे. तसेच शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी वेबपोर्टलद्वारे अर्ज भरलेल्या परंतु, रिक्त जागेअभावी वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहिलेल्या उर्वरित पात्र विद्यार्थ्यांना या पोर्टलद्वारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येणार असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी पोर्टलवर शासकीय वसतिगृह प्रवेशाचा ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे. तरी शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी, तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेबपोर्टलवर ऑनलाईन अर्ज करून स्थानिक गृहप्रमुख, गृहपाल यांच्याकडे संपर्क साधून प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

## पोलिसांच्या विविध मागण्यासाठी सिंदफणा पुलावर रास्तारोको आंदोलन सपन्न

माजलगाव (प्रतिनिधी) : भारतीय संघ राज्यातील पोलीस खाते, सुरक्षारक्षक भारतीय पोलीस खात्याच्या कर्मचारी यांच्या विविध मागण्यांसाठी दि.६ ऑगस्ट रोजी माजलगाव येथील सिंदफणा नदी पुलावर पोलीस मित्र संघटनेच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले.



भारतीय संघ राज्यातील पोलीस खाते,सुरक्षारक्षक व या संबंधित इतर विभागाची खालील८ मागण्या मान्य करण्याबाबत दि.१५ जुलै रोजी केंद्र शासन व राज्य शासन दोन्ही प्रशासनाला निवेदने दिली होती. परंतू मागण्याचा विचार प्रशासनाने विचार केला नसल्याने, माजलगाव तालुका सिंदफणा नदीच्या पुलावर सकाळी ११ वाजता रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. पोलीस हा आपल्या जीवनातील अविभाज्य घटक आहे.त्यामुळे त्यांच्यासाठी आपण आपल्या जीवनातला अनमोल असा काही वेळ दिला पाहिजे तर आपले जीवन सार्थकी लागेल. पोलीस खाते व त्यांच्या जीवनात समस्या खूप आहेत. परंतु त्यांच्यासाठी कोणीच आवाज उठवण्यास तयार नाही.उलट त्यांना बदनाम करीत आहेत.तरी देखील त्यांच्या न्याय हक्कासाठी खालील मागण्या केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी विशेष अधिवेशन बोलवून लवकरात लवकर मान्य करण्यात याव्या व तसे कायदा करून आदेश पारित करण्यात यावे. आंदोलनाच्या पुढील मागण्यांचा समावेश आहे.

भारतीय लोकसंख्येनुसार प्रत्येक१००० हजार व्यक्ती प्रमाणे१ एक पोलीस अधिकारी असला पाहिजे.त्यानुसार पोलीस भरती करण्यात यावी. पोलीस अधिकाऱ्यांच्या ड्युटीचा वेळ कमी करून ८आठ तास करण्यात यावा.पोलीस अधिकारी आपले कर्तव्य बजावत असताना त्यामध्ये इतर प्रशासनातील अधिकारी,नेते मंडळी,आजी-माजी प्रतिनिधी किंवा प्रतिष्ठित व्यक्ती यांनी हस्तक्षेप करू नये किंवा मध्यस्थी करू नये,तसेच आपल्या इतर अधिकाराचा वापर अथवा पोलीस अधिकाऱ्यावर दबाव आणू नये(यासाठी नवीन कायदा तयार करण्यात यावा).पोलीस अधिकारी आपले कर्तव्य बजावत असताना त्यांच्या जीविताला,इतर व्यक्ती जमाव किंवा इतर कारणांनी काही इजा,दुखापत मारहाण किंवा इतर काही कारण झाले.तर संबंधित व्यक्तीकडून दंड व कायदा प्रमाणे शिक्षा त्या व्यक्तीस शिक्षा करण्यात यावी.(यासाठी नवीन कायदा करण्यात यावा).पोलीस अधिकाऱ्यांच्या राहण्याची निवासस्थानाची व्यवस्था करण्यासाठी प्रशासनाने विशेष टीम देण्यात यावी.त्यांची व्यवस्था ही त्याठिकाणा तील(महानगरपालिका, नगरपरिषद, ग्राम पंचायत, शासनातील, संबंधित विभागाने पाहण्यात यावी. पोलीस अधिकारी आपले कर्तव्य बजावत असताना भ्रष्टाचारी, दोषी, गुन्हेगार, बेजबाबदार किंवा इतर कारणांमध्ये आरोपी, दोषी, सापडला किंवा आढळला तर त्या पोलीस अधिकारी व संबंधित सर्व व्यक्तीवर (जलद न्यायालयात तक्रार दाखल करून) संबंधित पोलीस अधिकारी किंवा संबंधित व्यक्ती यांचे पूर्णपणे अधिकार,सुविधा,इतर अधिकार,सुविधा,रद्द,बंद,करून काढून घेण्यात यावे.तसेच पोलीस अधिकारी व संबंधित व्यक्ती यांना दंड कायद्याप्रमाणे देण्यात यावा. त्याची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात यावी(यासाठी नवीन कायदा करण्यात यावा), पोलीस अधिकाऱ्यांची जुन्या पोलीस कॉलनी, राहती घरे,अधिकारी राहतात ड्युटी करतात त्या क्षेत्रात ही त्यांच्या ठिकाणी सर्व सुविधांनी, आधुनिक सुविधांनी,नुसार प्रत्येक अधिकारी यासाठी नवीन घरी बांधून देण्यात यावेत,पोलीस अधिकारी आपले कर्तव्य बजावत असताना शहीद झाला किंवा त्यास अपंगत्व आले,तसेच इतर काही कारणाने काही झाले तर त्यांना त्यांची पूर्ण पगार देण्यात यावी,तसेच त्यांच्या कुटुंबासाठी घर,शाळा असी व्यवस्था करण्यात यावी. अशा पोलीस खात्यांच्या आठ मागण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी लवकरात लवकर विशेष अधिवेशन बोलवून मागण्यांचा जीआर लवकरात लवकर काढण्यात यावा. या मागण्यासाठी प्रत्येक भारतीयांनी पोलीस खात्याच्या या आंदोलनामध्ये सामील होऊन या मागण्यांसाठी हा लढा मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत हे आंदोलन चालू राहील. तसेच पोलीस मित्र संघटना व इतर संघटना यांनी आपापल्या भागात या पोलीस खात्याच्या या मागण्यासाठी आंदोलन करण्यात यावे,अशी मागणीही यावेळी या संघटनेने केली आहे.

## लिएंडर पेस यांनी घेतली राज्यपालांची भेट

मुंबई, : भारताचे प्रसिद्ध टेनिसपटू लिएंडर पेस यांनी आज राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी 'इंटरनॅशनल टेनिस हॉल ऑफ फेम'मध्ये विजय अमृतराज यांच्यासह स्थान प्राप्त केल्याबद्दल लिएंडर पेस यांचे अभिनंदन केले.



# भोकर मतदार संघातील घराणेशाही संपवण्यासाठी सुजाण मतदार एकवटणे काळाची गरज - दादाराव पाटील ढगे

भोकर / सिद्धार्थ जाधव / देशाचे दिवंगत गृहमंत्री शंकरराव चव्हाण,स्वतः अशोक चव्हाण,सौ.अमिता चव्हाण यांनी भोकर विधानसभा मतदार संघाचे नेतृत्व केले. मागील चाळीस वर्षापासून घरात निर्विवाद एकहाती सत्ता आहे.असे असतानाही पुन्हा लेकीसाठी भोकर मतदासंघावर दावा केला जातोय पक्षातील अन्य कोणास संधी का देऊ नये ? येथील भूमिपुत्रांनी अजून नुसत्या सतरंज्याच उचलावीत काय ? असा सवाल समाजसेवक दादाराव पाटील ढगे यांनी दिनांक ०५ ऑगस्ट रोजी भोकर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेतुन बोलताना उपस्थित केला.

आगामी विधानसभा नवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर भोकर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाकडून सुकन्या इंजि.दामिनीताई ढगे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची तयारी समाजसेवक दादाराव पाटील ढगे यांनी सुरू केली असून याच पार्श्र्वभूमीवर त्यांनी बेधडक आपली भूमिका आयोजित पत्रकार परिषदेत विषद केली.खा.अशोक चव्हाणांचे राजकारण हे सुडाचे व हुकुमशाही प्रवृत्तीचे सूरू झाले आहे. भोकर विधानसभेत वडिलांनी, स्वतः अशोक चव्हाण,त्यांच्या सुविद्य पत्नी अमिता चव्हाण यांनी नेतृत्व केले असून पुन्हा मुलगी श्रीजया चव्हाण यांना प्रमोट करण्याचा त्यांचा खटाटोप सुरू आहे. या




वारसा परंपरेचा ठासून विरोध करताना भूमिपुत्राचा आग्रह धरून माझी मुलगी इंजिनीयर दामिनी दादाराव पाटील ही काँगेस पक्षाकडून भोकर मतदार संघात निवडणूक लढवणार हे जाहीर करताच अशोकरावांनी माझ्या विरोधात कुटील कार्यवाह्या सूरु केल्या आहेत. क्रेशरवर वनविभागाची बेकायदेशीर धाड टाकून मालमत्ता जप्तीची कार्यवाही केली आहे. कामाची बिले रोखून धरण्यास सांगितले गेले आहे. माझे सर्व व्यवसाय नियमानुसार सूरु असताना प्रशासनाच्या माध्यमातून कार्यवाह्या करण्यात येत आहेत हे चुकीचे आहे. याउपर अशोक चव्हाण यांनी माझी अख्खी प्रॉपर्टी जप्त केली तरी मी यांच्या कुटील कारस्थानाला भिक न घालता मला जेलमध्ये टाकले तरीही जेलमधून अशोक चव्हाण यांच्या विरोधात निवडणूक लढवणार असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

चव्हाण घराण्याच्याच हातात मागिल चाळीस वर्षापासून भोकर विधानसभा मतदार संघाची बागडोर असताना या मतदार संघात औद्योगिकीकरणाचा विकास झाला का?तरुणांच्या हाताला कामे मिळाले का? किती तरुणांना रोजगार मिळाला?उपजिविकेसाठी तरुणांना परराज्यात किंवा मुंबई,पुणे,संभाजी नगर सारख्या ठिकाणी स्थलांतरित का व्हावे लागत आहे? असे विविध प्रश्र्न त्यांनी उपस्थित करून येथील शेतकऱ्यांना बारमाही पाण्याची सुद्धा व्यवस्था ही करण्यात आली नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांना आता भोकर मतदार संघातल्या गल्लीबोळातून फिरण्याची वाईट वेळ आली आहे. मतदार संघाचा विकास झाल्याची ओरड करणाऱ्यांनी खराच मतदारसंघाचा शास्वत विकास केला असता तर माय-बाप,लेकींना दारोदार फिरून मताची भिक मागण्याची वेळ आली नसती असा टोला लगावुन घराणेशाहीला संपवायचे असेल तर अशोक चव्हाण यांच्या विरोधात एल्गार झालाच पाहिजे.यासाठी सर्वप्रथम मी समोर आहे नागरिकांनी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – महाराष्ट्रात आरक्षणाची गरजच काय असा सवाल मनसेचे राज ठाकरे यानी केला आहे तो कसा व कशासाठी केला असावा हेच कळत नाही. डोकं बधीर झालय.

दुसरा – अरे, हेच राज ठाकरे हिंदूत्ववादी होते. ते शिवसेनेतून बाहेर पडले, परराज्यातील नागरीक, कामवाले यांचेवर तोंडसूख घेतले आणी आता मराठा समाजालाच वेठीस धरुन आरक्षणाची गरज काय असे म्हणतात ते घातकी वर्तन ठरावे यात शंका नाही.

एक – अहो, महाराष्ट्रच काय सारा भारत लोकशाही संविधान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हेतूपूरस्कृत वापर करतो हे ज्ञात आहे. पण ठाकरे शिवसेनेच्या आधीन असलेले उध्दव ठाकरे, राज ठाकरे, याना शिवसेनेचे सरसेनापती बाळ ठाकरे यानी घरात नाही भाकरीसाठी पीठ आणी कशाला मागता आंबेडकराच्या नावाने विद्यापीठ अशी नाचक्की भावना व्यक्त केली होती. तेच उध्दव–राज ठाकरे कोणासाठी, कोणाबद्दल बोलतात हेच कळत नाही. म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, फडणवीस, दोन्हीही ठाकरे जातीयवादी, धर्मांध शक्तीचे आहेत. त्याना फक्त बेगडी चाल करुन सत्ता हस्तगत करायची आहे, एवढेच.

एक – अहो, सत्ता हस्तगत करायची असेल तर मराठ्याना, दलिताना दुःखवून कसे चालेल हे राज ठाकरे यांना कळत नाही काय ?

दुसरा – अरे, लोकसभा निवडणूकीत मोदी, भाजपाला राज ठाकरे यानी पाठींबा दिला होता तिथं डाळ शिजत नाही म्हणून स्वबळाचा नारा आणी २५० चा तोरा म्हणजे नाकापेक्षा नथणी जड असेच म्हणावे लागेल ?

# मागास, भकास, झकास ?

## संपादकीय...

काय बाय सांगू, कोणास सांगू, लाज वाटतीया बाय, हे सगळे मागास, भकास, झकासच म्हणून आरक्षणावर ताव मारीत आहेत अशा वेळी मी बाई लोकशाही कोणाला तारु, कोणास मारु, लाज वाटतेय बाई ही कर्णकर्कश आवाज लोकशाही काढीत असेल तर सत्ताधारी आणी विरोधक हे कोणत्या विषयावर ठाम राहून जनतेचे कल्याण करणार आहेत असा प्रशनाकिंत विषय चर्चिला जातो आहे. तो वास्तवाच्या पलिकडचा नसावा असे वाटते.

मराठा आरक्षण कूणबी प्रमाणपत्र, ही अवघड समस्या त्यात ओबीसीच्या कोष्टीकी फाशातून कूणबी म्हणून मराठ्याना आरक्षण देणे ही मागणी रास्त की अरासत असावी हा भाग महाराष्ट्र सरकारचा असला तरी न्यायीक प्रक्रियेतून मागास कोण, भकास कोण, झकास कोण याचा तपशील किंवा अंदाज हा आरक्षणवादी किंवा आरक्षण विरोधी समूहाला नाहीच नाही, पंरतू राजकारणी सत्ताकारणी लोकप्रतिनिधीना तरी या फरकातले डोंबले कळते आहे काय असा प्रश्न निर्माण झाला असून, केवळ राजकारण, सत्ताकारणासाठीचाच हा आरक्षण खेळ असावा असाच समज सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होताना दिसतो आहे त्यात गैर कांही नसावे असे वाटते.

अनुसूचित जाती, जामतीवर गेल्या दहा वर्षापासून अन्याय, अत्याचार होत आहेत. त्यात केंद्र व राज्य सरकारही सत्तेच्या लालसेपोटी कोणत्याही जाती, धर्म, वर्गाच्या विरोधात बोलू शकत नाही, कारवाई करु शकत नाही हे वास्तव त्यांनाच ठाऊक असतानाही मराठा आरक्षणाचा वाद पेटला, पेटविला गेला हे शासन, प्रशासनाच्या सोयीनुसारच घडले असावे. त्यास सर्वपक्षीय साथ असल्याशिवाय कोणताही मराठा नेता अशी आक्रमक भूमिका घेवू शकत नाही असे वाटते कारण मराठा समाजाचे अण्णासाहेब पाटील, शशिकांत पवार हे वसंतदादा पाटीत ते विलासराव देशमूख पर्यत हतबल झाले होते पण आज मराठा आरक्षणाचा वादातीत प्रश्न, ओबीसीचा गंभीर प्रश्न आणि त्यातच अनुसूचित जाती, अनूसूचित जमातीच्या चक्क उपवर्गीकरणाचा विषय पूढे आल्याने विविध जाती, धर्माचा वैभवशाली, विविधतेने बाटलेला भारत हा हिंदूत्ववादी, मनूसंस्कृतीच्या विळख्यात अडवकवून भारताचे भले कोण करणार आहे हा गंभीर प्रश्न सर्व सामान्य जनतेसमोर घातक बनल्याचेच चित्र दिसते आहे त्याचे काय.

लोकशाही भारत, संविधानात्मक भारत, फूले, शाहू, आंबेडकराचा भारत, नंतरच्या बेरजेत छ. शाहू ऐवजी शिवाजी महाराज, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अहिल्यादेवी होळकराचा महाराष्ट्र बनलाहा विषय वादातीत असला तरी अनूसूचित जाती, जमातीचे वर्गीकरण करताना मराठा समाजातील उपजातीचे उपवर्गीकरण केल्याविना, जातनिहाय जनगणना केलयाशिवाय कोण मागास, कोण भकास, कोण झाकास याचे स्पष्ट सादरीकरण होऊच शकत नाही कारण नरेंद्र मोदी, अमित शहा, देवेद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार, किंवा राहूल गांधी, शरद पवार, उध्दव ठाकरे हे कोणी कोणाचे ठेकेदार असूच शकत नाहीत हे लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे त्याचे काय ?

# पावसाळ्यात जलजन्य, कीटकजन्य आजारांपासून बचावासाठी अशी घ्या काळजी !

सध्या जिल्ह्यात सर्वदूर पाऊस होत असून पावसाच्या पाण्यामुळे पिण्याचे पाणी दूषित होवून कॉलरा, गॅस्ट्रो, कावीळ, अतिसार, हगवण, विषमज्वर, पोलिओ इत्यादी जलजन्य तसेच साठलेल्या पाण्यात डासांची पैदास झाल्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुन्या इत्यादी किटकजन्य आजराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी पावसाळ्यात जलजन्य व किटकजन्य आजारांपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी पुढीलप्रमाणे काळजी घेणे आवश्यक आहे.

नागरिकांनी पावसाळ्यात पिण्याचे पाणी उकळून व गाळून वापरावे अथवा निर्जंतुकीकरणासाठी मेडीक्लोरचा वापर करावा. बाहेरील असुरक्षित पाणी पिण्यासाठी वापरु नये. घराबाहेर पडताना घरचे निर्जंतुकीकरण केलेले पाणी सोबत घ्यावे. पिण्याचे पाणी साठविण्यासाठी तोटीच्या टाकाचा वापर करावा अथवा पिण्याच्या पाण्याचे भांडे लहान मुलांच्या हाताला येणार नाही, अशा उंचीवर ठेवावे. पाणी घेण्यासाठी वोगराळ्याचा वापर करावा. पिण्याच्या पाण्यात हात बुडविल्यास हातावरील रोगजंतू पाण्यात मिसळून पाणी दूषित होवू शकते. रोगजंतू प्रामुख्याने तळहातावर व नखाखाली असतात. त्यामुळे हात साबणाने स्वच्छ धुवावेत व नखे नियमित कापावीत. पावसाळ्यात माशांचा प्रादुर्भाव जास्त होत असल्याने घरातील अन्न पदार्थांवर माशा बसू नयेत, यासाठी पालकांनी दक्षता घ्यावी.

जास्त पिकलली, सडलेली फळे खाऊ नयेत. उघड्यावर ठेवलेल्या भाज्या घरी आणल्यानंतर स्वच्छ धुवूनच त्याचा वापर करावा. पावसाळ्यात बाहेरचे पदार्थ खाणे टाळावे. हॉटेलमध्ये उघड्यावर ठेवलेले व शिळे अन्न पदार्थ खाऊ नयेत. गाड्यावरील कापून ठेवलेली फळे खाऊ नयेत. कारण त्यावर माशा आणि धूळ बसून ती रोगजंतूंनी दूषित झालेली असू शकतात. तसेच फळांचा ज्यूस बनवितांना निर्जंतुक पाणी न वापरल्यास जलजन्य आजाराची लागण होऊ शकते.

हॉटेल व्यावसायिकांनी व अन्न पदार्थ विकणाऱ्या दुकानदारांनी अन्न पदार्थ उघड्यावर न ठेवता ते काचेच्या कपाटात ठेवावेत अथवा जाळीदार झाकणाने झाकून ठेवावेत. अन्न पदार्थावर माशा बसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच पिण्यासाठी निर्जंतुक कलेले पाणी ग्राहकांसाठी उपलव्ध करावे, पाणी माठे उघडे ठेवू नये, हॉटेलमधील स्वयंपाकी व वेटर्स यांची वैयक्तीक स्वच्छता हाताची नखे कापलेली असणे, हात साबणानं स्वच्छ धुणे इत्यादी बाबींकडे हॉटेल मालकांनी लक्ष द्यावे. शौचास जावून आल्यानंतर व जेवणापूर्वी हात साबणाने स्वच्छ धुवून घ्यावेत, हात धुताना साबणाचा फेस होईपर्यंत दोन्ही बाजूनी स्वच्छ धुवून घ्यावे. शौचासाठी शौचालयाचाच वापर करावा. उघड्यावर शौचास बसल्याने मलाद्वारे पिण्याचे पाणी दूषित होते. तसेच त्यावर माशा बसून अन्नपदार्थ दूषित होतात. दूषित पाण्यामुळे लहान मुले अथवा वृद्धांना संडास उलटीचा त्रास झाल्यास त्यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन तीव्र स्वरुपाची जलशुष्कता निर्माण झाल्याने मृत्यू होवू शकतो. अशावेळी त्यांना त्वरित जवळच्या शासकीय दवाखान्यात दाखल करून औषधोपचार करावा.

**किटकजन्य आजारांबावत घ्यावयाची काळजी**

साचलेल्या शुद्ध पाण्यात अथवा गढूळ पाण्यात डासांची पैदास होते. त्यामुळे साचलेल्या पाण्याचा त्वरित निचरा करावा. वापरात नसलेल्या कुलरच्या टाक्या, जुने टायर्स, बकेट, नारळाच्या करवंट्या, छतावरील अडगळ इत्यादीमध्ये साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होते. त्यामुळे हे त्वरित हटवावे. सर्व पाण्याच्या टाक्या, भांडे आठवड्यातून एकदा स्वच्छ करून कोरडा दिवस पाळावा. सायंकाळी विशेषतः ६ ते ८ च्या दरम्यान डास घरात प्रवेश करतात, या काळात दारे खिडक्या बंद ठेवाव्यात. दारांना व खिडक्यांना स्टेनलेस स्टील अथवा नॉयलॉन जाळ्या बसवून घ्याव्यात. झोपताना मछरदानीचा वापर करावा. सेप्टिक टँकच्या व्हेंट पाईपला नॉयलॉनची जाळी बसवावी.

गच्चीवर असलेल्या भंगार वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही, याची काळजी घ्यावी. कोणताही ताप अंगावर काढू नका. कोणत्याही प्रकारचा ताप आल्यास नजीकच्या शासकीय दवाखान्यात जावून तपासणी करावी आणि औषधोपचार घ्यावा. स्वतः हून कोणत्याही आजारावर उपचार करणे टाळावे.

# २०१३ च्या पोलीस उपनिरीक्षक अहर्ता परिक्षेतील ६१० अंमलदारांची पोलीस उपनिरीक्षक पीएसआय पदी बढती

बालासाहेब मस्के यांचा पोलीस अधीक्षकांनी केला सत्कार



लातूर :–राज्यातील पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्यासाठी विभागीय अर्हता परीक्षा २०१३ मधील पात्र असलेल्या ६१० पोलीसअंमलदारांना सेवा ज्येष्ठतेच्या आधारावर पोलीस उपनिरीक्षकपदी बढती देण्यात आली आहे. यात लातूर जिल्हा पोलीस दलातील १० पोलीस अंमलदारांच्या पदोन्नतीचा समावेश असून यातील बालासाहेब मस्के यांचा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासह नेटिझन मेडिया सर्विसेसच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने शाल फेटा बांधून सत्कार केला आहे .

विशेष पोलीस महानिरीक्षक के. एम. मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी याबाबतचे आदेश काढला आहे.कॉन्स्टेबल म्हणून भरती झालेल्या कर्मचाऱ्याची आपण किमान पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) म्हणून निवृत्त व्हावे, अशी अपेक्षा असते.पदोन्नतीने भरल्या जाणाऱ्या उपननिरीक्षकपदांचा वेग अत्यंत कमी आहे. साहजिकच यात हजारो कर्मचाऱ्यांचे अधिकारीपदाचे स्वप्न हे स्वप्नच राहते. गेल्या अनेक वर्षांपासून पोलीस हवालदार परीक्षा उत्तीर्ण होऊनही पदोन्नतीपासून वंचित राहिले होते. त्यातील अनेक जण वयोमानानुसार सेवानिवृत्त देखील झाले आहेत. पदोन्नती मिळालेल्या सर्व अंमलदारांनी त्यांची वयाची ५० वर्षे ओलांडलेली आहे. त्यातील ९० टक्के अंमलदार हे नजीकच्या २ ते ५ वर्षांच्या कालावधीत वयोमानाने सेवानिवृत्त होणार आहे.

लातूर जिल्ह्यातील पदोन्नती झालेल्या पोलीस कर्मचारी भागवत वामनराव मुळे,शिवानंद बाबुराव मुरुडकर, स्वरूप नरसिंगराव धुमाळ,बालासाहेब नागोराव मस्के,अरुण मारुती तलवार,मकबूल महेबुब शेख, मुक्तार इब्राहिम शेख,भिमू लक्ष्मण देवकर,आदिनाथ दत्तात्रय शिरसाठ रामचंद्र पुंडलिक गोखरे यांची पदोन्नती झाली आहे.

# काय बोलता राव ?

लातूर तसं चागंल पण वेशीला टागलं अशी कुजबूज विरोधकात होत होती. काँग्रेसचे कोण, भाजपाचे कोण, त्यांचे, त्यांचे मित्रपक्ष कोण, त्याचे नेते कोण आहेत याचा थांगपत्ता लागत नव्हता पण आजघडीला विधानसभा निवडणूकीचे वेध लागताच कोणी उमेदवारीसाठी तर कोणी प्रचार, प्रसारप्रमूख म्हणून पूढे यावे यासाठी सर्वपक्षीय कार्यकर्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती पासून कामाला लागले असून जात, धर्म, पक्ष बाजूला ठेवून अन्याय, अत्याचाराचा विषय न्यायालयाच्या वेशीवर टांगण्याचा प्रयत्न करीत आहेत ही एक जमेची बाजू वाटते.

**काय बोलता राव,**

अरे, सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते सार्वजनिक कार्यक्रमात एकत्र येतात पण ते दुरावत गेले की, त्यांचे उणे, दुणे काढून मी आणी आम्हीच कसे निष्ठावंत, पारदर्शक, कार्यरत आहोत असे दाखविण्याची कृती, वृती नसतानाही प्रसारमाध्यमातून तसे दाखविण्याची स्पर्धा असते पण आजघडीला अल्पवयीन मूलीवरील अन्याया विरुध्द सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते एकवटून निषेध करीत आहेत, कारवाईची मागणी करीत आहेत पण लातूरातील एका कन्येची निर्घूण हत्या झाली त्या संदर्भात कोणीच वाच्चता करीत नाहीत हीच मागासगर्वीय, दलित चळवळीची ओळख ठरावी. पण आंबेडकरी चळवळीचे घोतक करु नये असाच बोलबाला होताना दिसतो आहे मग बोला दाजीबा !

# मतदार यादीचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जिल्ह्यात एकत्रिकृत प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध;

लातूर, (जिमाका) : भारत निवडणूक आयोगाने १ जुलै २०२४ या अर्हता दिनाकांवर आधारित छायाचित्र मतदार यादीचा (दुसरा) विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार एकत्रिकृत प्रारूप मतदार यादी जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तहसीलदार कार्यालये आणि जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर आज (दि. ६) रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. २० ऑगस्ट २०२४ पर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी दिली.

मतदार यादीचा (दुसरा) विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत २५ जून २०२४ ते ५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याद्वारे घरोघरी भेटी देवून तपासणी, पडताळणी, योग्य प्रकारे फोटो तसेच मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण व प्रमाणीकरण करण्यात आले आहे. या कार्यक्रमानुसार एकत्रिकृत प्रारूप मतदार यादी ६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. २० ऑगस्ट २०२४ पर्यंत मतदार यादीवर दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. या काळात दावे व हरकती स्वीकारण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाणार आहे. दावे व हरकती निकाली काढण्याची मुदत २९ ऑगस्ट २०२४ पर्यंत असून ३० ऑगस्ट २०२४ रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी केली जाणार आहे.

१ जुलै २०२४ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे सर्व नागरिक मतदार म्हणून नाव नोंदणीस पात्र आहेत. नुकत्याच पार पडलेल्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार म्हणून नोंदणी झालेली नाही अथवा अद्याप मतदार म्हणून नोंदणी केली नसल्यास, अशा नागरिकांना छायाचित्र मतदार यादीच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत २० ऑगस्टपर्यंत आपले नाव मतदार म्हणून नोंदवता येणार आहे. भारत निवडणूक आयोग व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार प्रत्येक मतदान केंद्रांवर विशेष मोहिमेचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

छायाचित्र मतदार ओळखपत्र हे मतदारांची ओळख पटविण्यासाठी असून मतदारांचे नाव मतदार यादीत असेल तरच मतदान करता येते. त्यामुळे नागरिकांकडे मतदार ओळखपत्र असले तरीही सध्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या एकत्रिकृत प्रारूप मतदार यादीत नाव असल्याची खातरजमा करून घेणे आवश्यक आहे. जेणेकरून मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क गमावण्याची वेळ येणार नाही. नागरीकांना आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करण्यासाठी https:// ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा Voter Helpline -pp या मोबईल अॅप चा वापर करावा. तसेच, प्रसिध्द करण्यात आलेली मतदार यादी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचेकडे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मतदार यादीचा विशेष संक्षिप्त कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व मतदान मदत केंद्र येथे (वोटर हेल्प सेंटर) मतदार यादीत नाव नोंदणीसाठी विहित नमुन्यातील अर्ज स्विकारले जातील. तसेच मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी किंवा आपल्या नोंदीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी https:/ Voters.eci.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. तरी लातूर जिल्ह्यातील १ जुलै २०२४ रोजी वयाची १८ वर्ष पूर्ण करणारे व अद्याप मतदार म्हणून नोंदणी न केलेल्या सर्व पात्र नागरीकांनी छायाचित्र मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत विहित नमुन्यातील अर्ज भरून आणि आवश्यक कागदपत्रे सादर करून आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले आहे.

# भोकरच्या रेल्वे हद्दीत अनधिकृत केलेले विमल इंटरनॅशनल स्कूलचे बांधकाम पाडण्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा

भोकर – येथील वार्ड क्रमांक २ मधील विमल इंटरनॅशनल



इंग्लिश स्कूलचे अनधिकृत बांधकाम रेल्वे हद्दीत करण्यात आल्याने ते तात्काळ पाडण्यात यावे बांधकामाची परवानगी देणाऱ्या नगरपालिका मुख्याधिकाऱ्यावर कारवाई करावी या मागणीसाठी दि.१३ ऑगस्ट २०२४ पासून भोकर उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा स्वप्नील केशवराव गाढे यांनी एका लेखी निवेदनाद्वारे केला आहे.

स्वप्निल गाढे यांनी दिलेल्या तक्रारीत असे म्हटले की विमल इंग्लिश स्कूल इंटरनॅशनल स्कूलचे संचालक ईश्र्वर रतन जाधव,डॉ.राम रतन जाधव, लक्ष्मण रतन जाधव यांनी वार्ड क्र.२ गट क्र.५५४ मध्ये बेकायदेशीर रेल्वे हद्दीत बांधकाम केले सदर बांधकामाची चौकशी करून केलेले बांधकाम पाडावे बांधकामाची परवानगी देणारे नगर परिषदेचे मुख्याधिकारी व परवानगी घेणारे यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी म्हणून दि.२५ जून दि. ८ जुलै दि. ११ जुलै दि.१५ जुलै२०२४ रोजी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना लेखी तक्रार केली होती परंतु या तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई झालेली नाही मुख्याधिकारी नगर भोकर यांनी विमल इंटरनॅशनल स्कूल बांधकामासाठी किती क्षेत्रफळाची परवानगी दिली ? परवानगी देते वेळेस रेल्वे विभागाचे ना हरकत घेतले काय ? अंदाजपत्रक जागेचा नकाशा जायमोक्यावर जाऊन चौकशी केली का ?

या सर्व बाबींची सविस्तर चौकशी करून स्कूलचे बांधकाम अनाधिकृत बेकायदेशीर असल्याने ते तात्काळ पाडून परवानगी देणारे व घेणाऱ्या संबंधितावर योग्य ती कारवाई करावी अन्यथा दि.१३ ऑगस्ट २४ पासून स्वप्निल गाढे हे उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहेत. सदरील तक्रारीच्या प्रति जिल्हाधिकारी,तहसीलदार, पोलीस निरीक्षक भोकर यांनाही देण्यात आल्या आहेत.

# नामा म्हणे

शंभर ते कोटी । रचण्या अभंग
झालेले ते दंग । नामदेव
नाम्याची ही युक्ती । ती वत्सल भक्ती
हरी नाम शक्ती । जपतसे
संतांची ही जाण । शब्द ते पवित्र
रेखाटसे चित्र । केशवाचे
वैष्णव हा होण्या । लागतसे टाळ
गळ्यात ही माळ । म्हणे नामा
जो मधूसुधना । लिहिला पाळणा
सांगितले जना । हरीनाम
भक्तीचा हा मळा । फुलवी सोहळा
केशव सकळा । नामा म्हणे
माझीया लोचणी । विठ्ठल तो वसे
प्रतीक्षा ती असे । नामा म्हणे
संतांचे साहित्य । नामदेव गाथा
लागतसे माथा । मनोमनी
संतांची चरित्र । नाम्या लिहीतसे
आम्हा कळतसे । इत्यंभूत
वत्सल अभंगी । ऐसा भक्त मिळे
जिवा भक्ती कळे । नामयाची
नामयाशी बोले । केशव बरवा
वारकरी खरा । शोभतसे
संत हे जाणाया । आळंदी चालावे
मुखी नाम घ्यावे । ज्ञानदेवा
उजळे जीवन । संत मन जाण
मूर्ती ही महान । नामयाची

**- विजय वाठोरे,हिमायतनगर नांदेड**
**९९७५५९३३५९**

# भोकर भाजपा युवा मोर्चाच्या तालुका सरचिटणीसपदी साई केंचे बेंबरकर यांची निवड

भोकर /सिद्धार्थ जाधव / आगामी विधानसभेच्या अनुषंगाने तालुक्यात भाजप युवा मोर्चाचे काम जोमाने करण्यासाठी नुकतीच तालुका सरचिटणीसपदी साई केंचे बेंबरकर यांची निवड करण्यात आली आहे. खासदार अशोक चव्हाण यांनी तालुका दौऱ्यादरम्यान भाजप युवा मोर्चाच्या कामाबाबत आढावा घेतला आणि यावेळी साई केंचे बेंबरकर यांची भाजप



तालुका युवा मोर्चाच्या सरचिटणीसपदी निवड करून त्यांना नियुक्तिपत्र दिले. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष गणेश कापसे बटाळकर, तालुकाध्यक्ष वेणू कोंडलवार, आत्रिक पाटील मुंगल, जगदीश भोसीकर, विनोदी चिंचाळकर,शेख युसूफ,रामचंद्र मुसळे, नागोराव दंडे, मॉन्टी ऱ्याकावार यांची उपस्थिती होती. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

### लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष युवराज जाधव यांना डॉ.एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता विभागीय पुरस्कार जाहीर

लातूर : महाराष्ट्र राज्य उच्च व



तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत येणार्या ग्रंथालय संचालनालयाचे सन २०२३ चे डॉ.एस.आर.रंगनाथन उत्कृष्ठ ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार ५ ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर करण्यात आले असून, छत्रपती संभाजी नगर विभागीय डॉ. एस.आर.रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कारासाठी लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष युवराज जाधव यांची निवड करण्यात आली आहे,त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

महाराष्ट्रातील जनतेचे सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृध्द करण्यासाठी व वाचन संस्कृती वृध्दिंगत होण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान लाभावे, ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा ,ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग ,ग्रंथालय संचालनालयाकडून दरवर्षी विविध पुरस्कार दिले जातात,त्यातील छत्रपती संभाजी नगर विभागाचा डॉ.एस.आर.रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाचे उपाध्यक्ष युवराज मोहनराव जाधव यांची निवड झाली आहे.रोख २५ हजार रुपये,सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट असे या पुरस्काराचे स्वरुप आहे असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव प्रताप बा.लुबाळ यांनी जाहीर केले आहे.

युवराज जाधव यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार,मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, कार्याध्यक्ष खंडेराव सरनाईक,प्रमुख कार्यवाह संतोष ससे,लातूरचे आ.अमित देशमुख,लातूर ग्रामीणचे आ.धीरज देशमुख ,लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे,कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर,कोषाध्यक्ष राम मोतीपवळे,सहकोषाध्यक्ष काशिनाथ बोडके व इतर पदाधिकार्यांनी युवराज जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

# फ्रीजमध्ये चुकूनही ठेवू नका 'ही' पाच फळे, पोषक तत्वे होतात कमी

ऑफिसला जाणाऱ्या महिला किंवा गृहिणी बऱ्याचदा एकदाच आठवड्यासाठी लागणाऱ्या भाज्या व फळे घरी घेऊन येतात आणि फ्रीजमध्ये ठेवतात. पण फळे फ्रीजमध्ये ठेवणे खरंच आरोग्यासाठी चांगलं आहे का, जाणून घेऊयात.

फ्रीज हा आता आपल्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. आजच्या धावपळीच्या आयुष्यात एकाचवेळी अनेक कामे करण्याची सवय लागून राहिली आहे. अनेकदा एकाच दिवशी आठवड्याभराच्या भाज्या आणून फ्रीजमध्ये ठेवल्या जातात. मात्र, काही फळे फ्रीजमध्ये ठेवणे योग्य नाहीये.

आरोग्यासाठी फ्रीजमध्ये अनेक दिवस ठेवलेले पदार्थ खाणे चांगले नसते. अशातच काही फळे फ्रीजमध्ये ठेवणे आरोग्याच्या दृष्टिने हानिकारक असते. कारण फ्रीजमध्ये ठेवल्याने त्यातील पौष्टिक गुणधर्म नष्ट होतात आणि मग ती फळे खाण्याचा काहीच फायदा होत नाही.

केळे

केळी चुकूनही फ्रीजमध्ये ठेवू नका. फ्रीजमध्ये ठेवल्यास केळी काळी पडू शकतात आणि लवकर खराब होतात. या फळातून इथाईलीन नावाचा गॅस निघतो यामुळं दुसरी फळेदेखील लवकर पिकतात.

सफरचंद

सफरचंद पौष्टिक फळ आहे, असे म्हणतात की जर तुम्ही रोज एक सफरचंद खाल्ले तर तुम्हाला कधीच डॉक्टरकडे जाण्याची गरज भासणार नाही.



पण जर तुम्ही सफरचंद फ्रीजमध्ये ठेवत असाल तर त्यातील पोषक तत्वे नष्ट होतात. पण जर सफरचंद रेफ्रिजरेटरमध्ये ठेवणे आवश्यक असेल तर ते कागदात गुंडाळून ठेवा

कलिंगड

टरबूजमध्ये पाण्याचे प्रमाण खूप जास्त असते, त्यामुळे ते शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. त्याचा आकार बराच मोठा असल्याने आपण ते एकाच वेळी खाऊ शकत नाही, म्हणून आपण काही भाग कापून फ्रीजमध्ये ठेवतो. पण असे केल्याने या फळातील अँटिऑक्सिडंटस आणि पोषक तत्वे नष्ट होऊ शकतात.

लिची

लिची हे देखील एक असे फळ आहे की जर ते जास्त वेळ फ्रीजमध्ये ठेवले तर ते आतून सडू लागते आणि त्यातील पोषक तत्वे नाहीसे होऊ लागतात, त्यामुळे त्याच दिवशी सेवन करावयाचे असेल तेव्हाच बाजारातून आणा.

आंबा

आंबा लवकर पिकल्यानंतर खराब होऊ शकतो म्हणून आपण ते रेफ्रिजरेटरमध्ये ठेवतो, परंतु असे केल्याने आंब्यातील पोषक आणि अँटीऑक्सिडंटस कमी होऊ लागतात.

# छोट्या-छोट्या गोष्टींवर तुम्हालाही राग येतो का? जाणून घ्या यामागचे कारण आणि उपचार

प्रत्येक व्यक्ती अनेक भावनांनी बांधलेली असते. ती व्यक्ती जशी हसते, तसाच त्या व्यक्तीला रागही येतो. तसेच ती व्यक्ती भावनिकही असते. हे सगळं घडणं साहजिक आहे. कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव सारखा नसतो. काहींना विनोद करायला आवडतो तर काही थोडे गंभीर असतात. अनेक वेळा बोलणाऱ्या आणि हसणाऱ्या लोकांनाही काही गोष्टी आवडत नाहीत. अशा वेळी ते चिडतात. पण, काही लोकांना प्रत्येक बाबतीत चिडचिड, जास्त राग येतो. मात्र, जास्त राग येण्याचा आरोग्याशी काय संबंध आहे. हे जाणून घेण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे का? खरंतर, वैद्यकीय शास्त्र सांगते की जर तुम्हाला वारंवार राग येत असेल आणि प्रत्येक छोट्या गोष्टीवर चिडचिड होत असेल तर त्याचा संबंध शरीरातील जीवनसत्त्वे आणि खनिजांच्या कमतरतेशी असू शकतो. याच संदर्भात सविस्तर माहिती जाणून घ्या.

'या' गोष्टींच्या अभावामुळे जास्त राग येतो

व्हिटॅमिन बी६ ची कमतरता : व्हिटॅमिन बी६ आपल्या शरीरात मेंदूच्या रसायनाप्रमाणे काम करते. हे मेंदूचे कार्य सुधारण्यास मदत करते. जर तुमच्या शरीरात व्हिटॅमिन बी ६ ची कमतरता असेल तर ते फील-गुड हार्मोनची कमतरता निर्माण करते, ज्यामुळे तुम्हाला राग येण्यास साहजिकच असते. त्याच्या कमतरतेमुळे मज्जासंस्था काम करत नाही.

व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता : जेव्हा शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता असते तेव्हा तुम्हाला नेहमी थकवा आणि सुस्तपणा जाणवू शकतो. अशा स्थितीत कधी-कधी लोक तुम्हाला इच्छा नसतानाही अनुभवू शकतात. कोणत्याही कामात मन लागत नाही अशा स्थितीत कोणतेही काम जबरदस्तीने केले तर चिडचिड होऊ शकते. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे, तुम्हाला नैराश्यासारखी लक्षणे देखील जाणवू शकतात.



झिंक : झिंक हे आपल्या शरीरातील मानसिक आरोग्यासाठी जबाबदार असते. त्याच्या कमतरतेमुळे तुम्हाला नैराश्याची लक्षणे जाणवू शकतात. तुमचा मूड पुन्हा पुन्हा खराब होऊ शकतो. चिंता आणि चिडचिड जाणवू शकते. झिंकच्या कमी पातळीमुळे ऑक्सिडेटिव्ह तणाव होऊ शकतो.

मॅग्नेशियम : मॅग्नेशियममुळे काही वेळा हा ताण सांभाळण्यात अडचण येते. तुम्ही छोट्या छोट्या गोष्टींवर अतिरिक्त वागता आणि इथूनच तुमची रागावण्याची सवय सुरू होते. मॅग्नेशियम हे एक शांत खनिज आहे जे मज्जासंस्थेचे पोषण करते आणि चिंता, भीती, अस्वस्थता, अस्वस्थता आणि चिडचिड टाळण्यास मदत करते. त्याची कमतरता असतानाही, तुम्ही चिडचिडे होतात.

यावर उपाय काय?

मूड वाढवणारे पदार्थ तुम्ही आहारात समाविष्ट करू शकता. व्हिटॅमिन बी ६ आणि व्हिटॅमिन बी १२ चा पुरेपूर फायदा घेऊ शकतील अशा गोष्टींचा आहारात समावेश करा. झिंक, मॅग्नेशियमची कमतरता भरून काढण्यासाठी तुम्ही मासे, ब्रोकोली, मोड आलेले धान्य खाऊ शकता. तुम्ही हिरव्या पालेभाज्या, एवोकॅडो आणि मांसाचे सेवन देखील केले पाहिजे.

# राशी भविष्य ०७ ऑगस्ट २०२४

मेष : शुभ रंग : लाल, शुभ दिशा: पश्चिम

आपल्या बुद्धी चातुर्याने समस्या दूर होतील. सुख समृध्दीत वाढ होईल. उतावेळपणा करू नका. वाचनाची गोडी वाढेल. प्रवास करण्याचे शक्यतो टाळा.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण

मित्र, शुभचिंतकाची भेट होईल. आई वडिलांच्या प्रकृतीची काळजी घ्या. गृहपयोगी वस्तू खरेदी करण्याचे योग आहेत. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

मिथुन : शुभ रंग: केसरी ,शुभ दिशा: पश्चिम

व्यापारात अडचणी निर्माण होतील. त्यामुळे आजचा दिवस धावपळीत जाणार आहे. मेहनतीच्या मानाने आज कमी आवक राहणार आहे. खर्च कमी करा. मुलांच्या व्यवहारामुळे मानसिक तणाव राहील.

कर्क : शुभ रंग :पांढरा,शुभ दिशा:उत्तर

अडकलेली कामे पूर्ण होण्याचे योग आहेत. मान प्रतिष्ठा सन्मान मिळणार आहे. जोखमीच्या कामापासून दूर रहा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

सिंह : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर

वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात लक्ष घालावे लागेल. वेळेवर निर्णय न घेतल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. धार्मिक भावना वाढीस लागेल.

कन्या : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : उत्तर

व्यावसायीक किंवा कौटुंबिक समस्यांचे समाधान होईल. कौटुंबिक चिंता दूर होईल. कोणाचाही द्वेष करू नका. विद्यार्थ्यांना परिक्षेत अपेक्षीत यश मिळेल.

तुळ : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: उत्तर

विचार पूर्वक काम केल्यास आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. व्यवसाया निमित्ताने झालेला प्रवास लाभदायक राहील. मुलांच्या कामाबल आनंदी रहाल.

वृश्चिक : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:उत्तर

आर्थिक स्थिती मजबूत होईल. मुलांच्या आरोग्याची चिंता मिटणार आहे. काही नवीन योजना बनवताल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वाहन सुख मिळेल.

धनु: शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: उत्तर

नवीन योजना कार्यान्वयीत होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहणार आहे. आर्थिक आवक वाढेल परंतु जास्त अपेक्षा धरू नका. व्यापारात फायदा मिळण्याची परिस्थिती निर्माण होईल.

मकर: शुभ रंग: लाल,शुभ दिशा: दक्षिण

वरिष्ठ लोकांमध्ये मान सन्मान मिळेल. बुद्धी चातुर्यामुळे कामात यश मिळेल. नवीन गुंतवणूक करण्याचे योग आहेत. आपल्या व्यसनांवर नियंत्रण ठेवा.

कुंभ : शुभ रंग :निळा, शुभ दिशा :पश्चिम

व्यवसायात यश मिळेल. दूरदर्शीपणामुळे अनेक अडचणींना व्यवस्थीत हाताळाल. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. धार्मिक भावना वाढीस लागेल.व्यापार चांगला चालेल.

मीन : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम

व्यवहारा कुशलतेमुळे आधिकारी वर्गाकडून स्तुती होईल. आर्थिक लाभ मिळेल. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मुलांच्या आरोग्याच्या तक्रारी दूर होतील.

०७ ऑगस्टला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य व नेपच्यूनचा प्रभाव आहे. तुमची बुध्दि तल्लख आहे व आकलनशक्ती सूक्ष्म आहे. पण तिचा उपयोग तुम्ही व्यावहारिक प्रश्न सोडविण्याऐवजी गूढ, अतार्किक अशा क्षेत्रात करता. जे जे बुध्दीपलीकडे रहस्यमय, आध्यात्मिक पातळीवर अस्तित्वात असते त्याच्या शोधात तुम्ही मग्न असता. जादूटोणा, परलोकविद्या, मृतात्म्यांशी संभाषण अशा क्षेत्रात तुम्हाला रस असतो. तुमच्याकडे असामान्य प्रतिभाशक्ती. आहे तिच्या जोरावर कलाक्षेत्रात अभूतपूर्व निर्मिती करण्याची क्षमताही आहे. कल्पनाविश्वात सतत रमण्यामुळे वास्तवापासून दूर जाण्याचा धोका आहे. श्रम, भास, भ्रामक कल्पनांच्या आहारी जाऊ नका. आपले पाप व्यवहाराच्या पातळीवर ठेवा. दुषित पाण्यापासून काळजी घ्या. नैराश्य, उदासीनतेमुळे मनोविकार होतील. मद्यपान, मादक द्रव्ये यापासून दूर राहा.

कार्यक्षेत्र : तुमची उत्तुंग प्रतिभाशक्ती काव्यलेखन, वाङमयीन कृतीच्या निर्मितीसाठी उपयोगी पडू शकेल. नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिकातही वेगवेगळ्या पात्राची निर्मिती त्यांच्या सूक्ष्म मनोव्यापारांचे यशस्वी चित्रण करू शकाल. मानसोपचार तज्ज्ञ, मनोविश्लेषक म्हणून कामगिरी करता येईल. वैद्यकीय क्षेत्रात किडनीचे व पोटाचे विकार यांचे तज्ज्ञ म्हणून भूमिका बजावाल.

प्रणयी जीवन : तुमचा स्वभाव अत्यंत हळवा असल्याने मनाने कठोर असलेल्या व्यक्तींशी तुमचे फारसे जमत नाही. तुमचे मूड सांभाळणे म्हणजे तुमच्या जिवलगाला एक तारेवरची कसरतच असते. ऐवढासा उपरोध, कटु वक्तव्य वा टीकेमुळे तुमच्या डोळ्यात अश्रु उभे राहतात.

# (गुरु वचन) मृत्यूचे भय नाही

एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल. दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते.

चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.

# मुख्याध्यापक संघाच्या आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मुख्यमंत्री व शिक्षण आयुक्तांना मागण्यांचे निवेदन

लातूर, -राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांच्या



विविध शैक्षणिक समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी लातूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघातर्फे मंगळवारी (दि. ६) येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्याध्यापक संघ व शिक्षण संस्थाचालक संघाच्यावतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

राज्यातील अशंतः अनुदानित, विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांना प्रचलित धोरणानुसार अनुदान टप्पा तत्काळ लागू करावा. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर अनुदानावर आलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांना जुनी पेन्शन योजना तत्काळ लागू करावी.१५ मार्च २०२४ चा सुधारित संच मान्यता शासन निर्णय रद्द करून शाळा तिथे मुख्याध्यापक पद हे धोरण असावे. १५ मार्च २०२४ रोजीचा वर्ग ५ वी व ८ वी च्या वर्गांचा दर्जावाढ निर्णय तत्काळ रद्द करावा. शिक्षक व कर्मचारी भरती तत्काळ सुरू करावी व शिक्षकेतरची पदे पूर्ववत ठेवावीत. राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांना कॅशलेस मेडिकल योजना तत्काळ लागू करावी. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. दरम्यान, मुख्याध्यापक संघ व शिक्षण संस्थाचालक संघाच्यावतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांना शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक करावी, याबाबत निवेदन देण्यात आले.

या आंदोलनात मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष प्रकाश देशमुख, वसंतराव पाटील, सी. के. साळुंके, शिक्षण संस्थाचालक संघाचे अध्यक्ष रामदास पवार, सचिव बाबूराव जाधव, कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्रा. गोविंदराव घार, डी. बी. लोहारे, जे. जी. सगरे, पी. एन. बंडगर, मधुकर पात्रे, कालिदास माने, प्रा. ओमप्रकाश साकोळकर, मुख्याध्यापक संघाच्या उपाध्यक्ष जयश्री ठवळे, कोषाध्यक्ष शिवराज म्हेत्रे, सचिव बजरंग चोले, प्रवक्ते कालिदास शेळके, उपाध्यक्ष उमेश पाटील, उपाध्यक्ष रमेश मदरसे, उपाध्यक्ष सचिन साबणे, उपाध्यक्ष जयश्री ठवळे, सहसचिव दत्तात्रय पारवे, सहसचिव अनिल कारभारी, सहकोषाध्यक्ष रामेश्वर कदम, सदस्य बालाजी मुंडे, एस. व्ही. मादलापुरे, परवेजखान पठाण, विशाल पात्रे, जयश्री पाटील, शिक्षक काँग्रेसचे अध्यक्ष बाळासाहेब चव्हाण, राष्ट्रवादी शिक्षक काँग्रेसचे अध्यक्ष मदन धुमाळ, दयानंद कांबळे, गंगाधर आरडले, शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे अमोल चामे, अनिल दरेकर, पांडुरंग देडे, पांडुरंग चिंचोलकर, कायम विनाअनुदान कृती समितीचे दिनकर निकम, इस्माईल शेख, ज्ञुक्टाफ संघटनेचे अध्यक्ष प्रा. शिवराम सूर्यवंशी, प्रा. एकनाथ पाटील, प्रा. मारुती सूर्यवंशी, सचिव बाळासाहेब बचाटे, राजेंद्र नागरगोजे, प्राथमिक मुख्याध्यापक संघाचे गणपतराव बाजुळगे, संभाजी नवघरे आदींचा समावेश होता.

# हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर अचानक छापेमारी करत एका दिवसात हातभट्टीचे ७२ गुन्हे दाखल. १० लाख ९३ हजार रुपयाचा मुद्देमाल नष्ट. लातूर पोलिसांची कारवाई

लातूर : लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर प्रभावी कारवाई



करण्यासाठी विशेष मोहीम व राबवून कोंबिंग ऑपरेशन राबवून अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ४ ऑगस्ट रोजी अचानकपणे लातूर जिल्ह्यातील लपून-छपून हातभट्टी तयार करणाऱ्या ठिकाणावर वरिष्ठांचे मार्गदर्शनात जोरदार कारवाई मोहीम राबविण्यात आली.

अवैध धंद्यावर कार्यवाही करण्यासाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेमध्ये लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील दुर्गम भागात लपून- छपून हातभट्टी तयार करून त्याची साठवणूक व विक्री करणाऱ्या वर गुन्हे दाखल करण्यात आले असून एकाच दिवशी व एकाच वेळी अचानकपणे संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दी मधील हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ठिकाणावर छापेमारी करण्यात आली. अवैध हातभट्टी तयार करून त्याची विक्री व्यवसाय करणाऱ्या ७३ आरोपीवर ७२ गुन्हे दाखल करण्यात आले असून १० लाख ९३ हजार ७९१ रुपयाचा मुद्देमाल हातभट्टी दारूचे साहित्य व रसायन जप्त करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात लातूर पोलिसांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करत एकाच दिवशी, एकाच वेळी ७२ ठिकाणी छापेमारी करून हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ७३ आरोपी विरुद्ध ७२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**व्हिडिओ ..**

अश्र्लील व्हिडिओ
होतो एखादं सादर
क्षणार्धात मनातला
निखळू पडे आदर
हातपाय उघडे पडे
सरकून जाते चादर
उघडी तोंडे बोलती
सगळे करे अनादर
सत्यअसत्य पोटात
बाहेर येतो जलोदर
काही बाही कुणीही
बोलू लागतातअधर
चारित्र्यअतिअमोल
करावी नेहमी कदर
चेहरा दिसे रेखीव
सावरतो जसा पदर
लाज राही पडद्यात
जीवन होईलं सुंदर
नीतळनिरामयवृत्ती
सामान्यांत सिकंदर
रंगबिरंगी बातम्यात
चालू राहतात सदर
उधळे सर्वत्र चिखल
नाचू लागतात बंदर
वावड्या प्रिय सर्वां
कोण पाहे अगोदर
नकोनको ती अफवा
राहते सहज गरोधर

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६..**

# केंद्रीय राखीव पोलीस दल भरती प्रशिक्षण संस्थेतील ३० व्या तुकडीचा दीक्षांत समारंभ उत्साहात



लातूर, (जिमाका) : केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या लातूर येथील भरती प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थींच्या ३० व्या तुकडीचा दीक्षांत समारंभ जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, केंद्रीय राखीव पोलीस दलाचे पोलीस उपमहानिरीक्षक तथा भरती प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अमीरुल हसन अन्सारी, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या उपस्थितीत पार पडला.

लातूरचे डेप्युटी कमांडट (प्रशासन) सुदीप राजाराम वाकचोरे आणि असिस्टंट कमांडट, परेड कमांडर नरेंद्रसिग चौधरी मान्यवरांचे यांनी स्वागत केले. यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी, जवानांचे कुटुंबीय आणि लातूर जिल्ह्यातील विविध कार्यालये व शाळांचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

देशातील विविध राज्यांमधून निवडलेले ११९ नवीन हवालदार (६ महिलांसह) यांनी २२ आठवड्यांचे कठोर मूलभूत प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षित सैनिक म्हणून देशाच्या सेवासाठी स्वतःला समर्पित करण्यास तयार आहेत. प्रशिक्षण काळात या जवानांना शारीरिक प्रशिक्षण आणि नि:शस्त्र लढण्याव्यतिरिक्त, नक्षलवाद आणि दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी घात, घेराबंदी, शोध आणि छापे यासारख्या कार्यवाहीचे कठोर प्रशिक्षण देण्यात आले आहे. विविध प्रकारची शस्त्रे वापरुन गोळीबाराचा सराव करण्यात आला आहे. विविध प्रकारची इम्प्रोव्हाइज्ड एक्सप्लनोझिव्ह उपकरणे आणि त्यांची यंत्रणा याविषयीही माहिती देण्यात आली आहे. त्यांना कायदेविषयक ज्ञान, जीवन वाचवणारे महत्वाचे आणि व्यावसायिक कौशल्याचे प्रशिक्षणही देण्यात आले आहे.

केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या लातूर येथील भरती प्रशिक्षण संस्थेतून आतापर्यंत एकूण ३० तुकड्यामध्ये ९ हजार ५६६ नवीन हवालदारांनी यशस्वीरित्या मूलभूत प्रशिक्षण घेतले आहे.

दीक्षांत समारंभाच्या समारोपाप्रसंगी पोलीस उपमहानिरीक्षक अमिरुल हसन अन्सारी यांनी ३० व्या तुकडील सर्व प्रशिक्षकांचे, विशेषत: ड्रिल आणि डब्ल्यूटी प्रशिक्षकांचे आणि सर्व नवीन राखीव कर्मचाऱ्यांचे हार्दीक अभिनंदन आणि शुभेच्छा दिल्या. कर्तव्यनिष्ठेचे आणि देशसेवेचे उत्कृष्ट उदाहरण ते घालून देतील, असा विश्र्वास व्यक्त केला.

यावेळी गुणवंत प्रशिक्षार्थींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ट्रॉफी व रँक देवून गौरविण्यात आले. तसेच कॉन्स्टेबल जी. बी. एल. विग्नेस यांची सर्वोत्कृष्ट प्रशिक्षार्थी म्हणून निवड करुन पुरस्कार प्रदान करण्यात आला. या समारंभात प्रशिक्षकांनी विविध प्रकारचे धाडसी प्रात्यक्षिके सादर केली.

## खरीप पिकांवरील रोग, अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी उपाययोजना करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका) : मागील पंधरा दिवसातील सततच्या पावसामुळे सोयाबीन पिकाची वाढ काही प्रमाणात जास्त झालेली आहे. जास्तीच्या कायीक वाढीमुळे या पिकात उंट अळी, तंबाखूवरील पाणी खाणारे अळी, हेलिकोवरपा आर्मी जेरा व त्यासोबतच चक्रीभुंग्याचा प्रादुर्भाव जिल्ह्यामध्ये आढळून येत आहे. या किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या पुढे जाऊ नये, शेतकऱ्यांनी उपाययोजना करण्याचे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात आले आहे.

हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी १० लिटर पाण्यामध्ये इमामेक्टिन बेण्झोयट १.९ टक्के (८ मिली) किंवा क्लोरॅन्ट्री निलीप्रोल मिली आणि लॅम्बडा ०४ मिली याप्रमाणे फवारावे. सोबतच बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव आटोक्यात ठेवण्यासाठी टेब्युकोनॅझोल आणि सल्फर (२० ग्रॅम) किंवा मन्कोझेब आणि कार्बेन्डाझिम २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये फवारणी घ्यावी.

ज्या ठिकाणी अतिरिक्त कायीक वाढ झालेली असेल, त्या ठिकाणी लिव्होसीन १० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. सोयाबीनची वाढ समाधानकारक असल्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे टॉनिक किंवा नत्रजन्य खताचा वापर या पिकामध्ये फवारणीसाठी करू नये. ज्या ठिकाणी पिवळा मोझॅईकची प्रादुर्भाव ग्रस्त झाडे आढळून येत आहेत, अशी झाडे त्वरित उपटून शेताबाहेर खड्डा घेऊन गढून टाकावीत. जास्तीच्या पावसाला तूर हे पीक संवेदनशील असल्यामुळे चराद्वारे जास्तीच्या पाण्याचा निचरा करावा. मर रोगाच्या प्रतिबंधात्मक उपाय योजणेसाठी जैविक बुरशीनाजके (ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्स) प्रति एकरी ४ किलो या प्रमाणात २०० लिटर पाण्यामधून ड्रेन्चिंग द्यावी.

**कापूस पिकावरील मावा, तुडतुड नियंत्रणासाठी फवारणी करावी**

मावा व तुडतडे च्या नियंत्रणासाठी फ्लोनिकॅमीड ५० टक्के ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी. कपाशी पिकात जास्तीच्या पावसामुळे मर लागली असेल तर कॉपर ऑक्सिक्लोराइड ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी. बोंड अळीच्या सर्वेक्षणासाठी कामगंध सापळ्यांचा वापर करावा व नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

मूग व उडीद या पिकांमध्ये भुरीच्या नियंत्रणासाठी बाविस्टीन १० ग्रॅम व शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी इमामेक्टिन बेण्झोयट ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी.

## प्रा.भाग्यश्री काळे केमिकल सायन्स या विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्रा.भाग्यश्री काळे या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणेद्वारा आयोजित केमिकल सायन्स या विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत,त्याबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या शुभ हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच डॉ.नाथराव केदार यांचा मुलगा इंग्रजी विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्यल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,औद्योगिक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आण्णाराव चौगुले,पदव्युत्तर समन्वयक डॉ.जमन अंनगुलवार, डॉ.नंदिनी कोरडे,डॉ.श्याम इबाते, डॉ. रवींद्र शिंदे,डॉ.नाथराव केदार, डॉ.श्रेयश माहूरकर,प्रा.राहुल जाधव,डॉ.ईन्नूस पठाण,प्रा. नवनाथ ढेकणे,डॉ.रामशेट्टी शेटकार,प्रा.अक्षता माने, प्रा.मनीषा मुंडे,एल.बी. जोशी,तारासिंग ठाकूर,बापू जंगम,महालिंग माळगे,माधव मसलगे,शंकर सूर्यवंशी,अर्चना शिंदे,राम बिर्ले,अभय येमपाळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.त्यांनीही त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# चांगल्या कामगिरीसाठी कॉँग्रेस पक्ष सरसावला मराठवाड्यातील तीन नवनिर्वाचित खासदारांच्या सत्काराचेही आयोजन

लातूर (प्रतिनिधी) : नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात आणि देशभरात चांगले यश मिळवल्यानंतर काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केले आहे. या अनुषंगाने पक्षाच्या वतीने विभागवार आढावा बैठका घेऊन २० ऑगस्ट रोजी मुंबई येथे विधानसभा निवडणुक प्रचाराचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यातील पहीली विभागीय आढाव बैठक १० ऑगस्ट रोजी लातूर येथे होत असून या निमीत्ताने मराठवाडयातील विजय मिळवीलेल्या पक्षाच्या तीन्ही खासदारांचा जाहीर सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्रात १३ खासदार निवडूण आले असून एका अपक्ष खासदारांने पक्षाला पाठींबा दिला आहे. लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस पक्ष राज्यात क्रमांक एकवर रहावा असे प्रयत्न पक्षाचे नेतेमंडळींनी सुरू केले आहेत. यानिमीत्ताने १० ऑगस्ट पासून राज्यात पक्षाचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या मार्गदर्शनाखाली विभागवार बैठका घेऊन प्रत्येक जिल्हयातील निवडणुक पुर्वतयारीचा आढावा घेण्यात येणार आहे.

यामधील पहीली आढावा बैठक १० ऑगस्ट २४ रोजी लातूर येथे होणार असून याच दिवशी लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण तसेच जालना येथील खासदार डॉ. कल्याण काळे यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे.

लातूर येथे होणारी आढावा बैठक आणि जाहीर सत्कार कार्यक्रमास राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विधानसभा विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, विधानपरिषद गटनेते सतेज पाटील, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार धीरज देशमुख यांच्यासह लातुर, धाराशिव, बीड जिल्हा पदाधिकारी, नेते उपस्थित राहणार आहेत.

दि. १० ऑगस्ट (शनिवार) रोजी सकाळी १० वाजता हॉटेल ग्रँड येथे मान्यवर नेत्यांची पत्रकार परिषद होईल. सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे पक्षाच्या मराठवाड्यातील नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार समारंभ संपन्न होइल. त्यानंतर दुपारी २ वाजता हॉटेल ग्रँड या ठिकाणी लातुर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांकडून निवडणूक पूर्वतयारीचा आढावा घेतला जाणार आहे, अशी माहिती जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे व शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव यांनी दिली आहे.

# विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकांच्या संशोधनाचे महत्त्व जाणून संशोधन क्षेत्रात उंच भरारी घ्यावी : प्रा.मनीषा बाजपाइ

दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक अलेक्झांडर फ्लेमिंग यांची जयंती साजरी

लातूर : येथील दि.०६ ऑगस्ट २०२४ रोजी वैज्ञानिक अलेक्झांडर फ्लेमिंग यांची १४३ वी जयंती साजरी करण्यात आली.महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिध्देश्र्वर बेल्लाळे आणि प्रा.डॉ.कोमल गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख तसेच नीट विभागाचे असिस्टंट कॉर्डिनेटर प्रा.मनीषा बाजपाई यांनी वैज्ञानिकांच्या प्रतिमेस वंदन करून केली.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.श्र्वेता मदने यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

प्रा.मनीषा बाजपाई वैज्ञानिक जयंतीच्याप्रसंगी बोलत असताना म्हणाल्या की,जयंती साजरी करणे यामागच्या महत्त्वाचा उद्देश म्हणजे वैज्ञानिकांच्या कार्याचे,संशोधनाचे मूल्य जाणून घेणे होय.आपल्या शैक्षणिक काळात कार्यरत असताना स्वतःला पूर्णतः समर्पित करून संशोधन क्षेत्रात भरारी घ्यावी.तसेच अलेक्झांडर फ्लेमिंग यांनी पेनिसिलीन नावाचे अँटिबायोटिक यावर संशोधन केले,जे आजच्या युगात सर्वजण त्याचा लाभ घेत आहेत आहे असे बोलून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



जैवतंत्रज्ञान विभागातील बी.एस्सी.प्रथम वर्षातील मद्ये मानसी यांनी सांगितले की,सर अलेक्झांडर फ्लेमिंग यांचा जन्म ०६ ऑगस्ट १८८१ रोजी झाला आणि ते स्कॉटिश चिकित्सक आणि सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ होते, जे जगातील पहिले व्यापक प्रभावी प्रतिजैविक पदार्थ शोधण्यासाठी प्रसिद्ध होते,ज्याला त्यांनी पेनिसिलिन असे नाव दिले.१९२८ मध्ये पेनिसिलियम रुबेन्स या साच्यापासून बेंझिलपेनिसिलिन (किंवा पेनिसिलिन जी) असे नाव देण्यात आले.या शोधाचे वर्णन आजपर्यंत रोगावर मिळालेला एकच महान विजय असे करण्यात आले आहे. या शोधासाठी, त्यांनी हॉवर्ड फ्लोरे आणि अर्न्स्ट बोरिस चेन यांच्यासोबत १९४५ मध्ये फिजियोलॉजी किंवा मेडिसिनमधील नोबेल पारितोषिक सामायिक केले. ११ मार्च १९५५ रोजी त्यांचे निधन झाले.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा.स्वरूप गावकरे,डॉ.नितीन चौहान तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी विशाल टार्फे,लक्ष्मण शिंदे,अश्र्विनी धवारे तसेच बी.एस्सी.जैवतंत्रज्ञान विभागातील प्रथम वर्षातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इतिहासात आजचा दिवस ७ ऑगस्ट

अंतरराष्ट्रीय

१७९४ – व्हिस्की क्रांती – अमेरिकेच्या पेनसिल्व्हेनिया राज्यातील शेतकऱ्यांनी व्हिस्की व अन्य गाळीव मद्यावरील कराविरुद्ध आंदोलन सुरू केले.
१८१९ – बॉयाकाची लढाई – सिमोन बॉलिव्हारच्या सैन्याने स्पेनच्या सैन्याचा पाडाव केला.
१८८८ – लंडनमध्ये जॅक द रिपरने पहिला खून केला.
१९४२ – दुसरे महायुद्ध – ग्वादालकॅनालची लढाई सुरू.
१९४५ – दुसरे महायुद्ध – अमेरिकन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमनने जपानच्या हिरोशिमा शहरावरील परमाणुबॉम्ब हल्ला सफल झाल्याचे जाहीर केले.
१९४७ – थॉर हायरडाल व त्याच्या चमूने बाल्सा लाकडाच्या तराफ्यातून १०१ दिवसात पॅसिफिक समुद्र पार केला.
१९६० – कोट दि आयव्होरला फ्रांसपासून स्वातंत्र्य.
१९६४ – व्हियेतनाम युद्ध – अमेरिकन काँग्रेसने टोंकिनच्या अखातातील हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी राष्ट्राध्यक्षलिंडन बी. जॉन्सनला सर्वाधिकार दिले.
१९६५ – सिंगापुरची मलेशियामधून हकालपट्टी.
१९६७ – व्हियेतनाम युद्ध – चीनने उत्तर व्हियेतनामला मदत करण्याचे जाहीर केले.
१९७६ – व्हायकिंग २ हे अंतराळयान मंगळाच्या कक्षेत आले.
१९९१ – सामान्य माणसांना वर्ल्ड वाइड वेब उपलब्ध.
१९९७ – फाइन एर फ्लाईट १०१ हे मालवाहू विमान फ्लोरिडातील मायामी शहरात कोसळले. ५ ठार.
१९९८ – टांझानिया व केन्यामधील अमेरिकन वकिलातींवर दहशतवाद्यांचा बॉम्बहल्ला. २२४ ठार, ४,५०० जखमी.

राष्ट्रीय

१९४७ – मुंबई महापालिकेने बेस्ट कंपनी आपल्या अधिकारात घेतली.
१८९० – 'केसरी' च्या खालोखाल प्रसिद्ध असणारे जहाल वृत्तपत्र 'मादेवृत्त' याचा पहिला अंक भाऊशास्त्री लेले यांनी प्रसिद्ध केला.
१९८५ – रौप्य महोत्सवी जागतिक बिलियर्डस् स्पर्धेत भारताचा गीत सेठी विजयी.
१९८७ – आरती प्रधानने इंग्लिश खाडी पोहुन पार केली.
२००४ – भारतीय बनावटीचा 'अर्जुन' रणगाडा लष्करात दाखल.
२००६ – तारखेनुसार तयार झालेल्या ७८६ या शुभ अंकानिमित्त सुफी संत ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्यावर विशेष प्रार्थना करण्यात आली.
२००७ – 'ब्लॅक' चित्रपटासाठी सुपरस्टार अभिताभ बच्चन व 'परजानिया'साठी सारिका यांना सर्वश्रेष्ठ अभिनेता व अभिनेत्रीचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर झाला.
२००८ – भारताने देशी बनावटीच्या 'नाग' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली.

जन्म

३१७ – कॉन्स्टेन्टियस दुसरा, रोमन स्म्राट.
१८१६ – माटा हारी, डच गुप्तहेर.
१९२५ – एम.एस. स्वामीनाथन, भारतीय शेतीतज्ञ.
१९३७ – डॉन विल्सन, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९४० – ज्यॉं–लुक डेहेन, बेल्जियमचा पंतप्रधान.
१९४८ – ग्रेग चॅपल, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू व मार्गदर्शक.
१९५९ – अली शाह, झिम्बाब्वेचा क्रिकेट खेळाडू.
१९६६ – जिमी वेल्स, विकिपिडीयाचा स्थापक.
१९७१ – डॉमिनिक कॉर्क, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.

निधन

४६१ – माजोरियन, रोमन स्म्राट.
४७९ – युराकु, जपानी स्म्राट.
११०६ – हेन्री चौथा, पवित्र रोमन स्म्राट.
१८५५ – मेरियानो अरिस्ता, मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्ष.
१९४१ – रवींद्रनाथ टागोर, बंगाली कवी, लेखक, नोबेल पारितोषिक विजेता.
१९७३ – जॅक ग्रेगरी, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.

प्रतिवार्षिक पालन

स्वातंत्र्य दिन – कोट दि आयव्होर.
मुक्ती दिन – टर्क्स व कैकोस द्वीप.

# तालुक्यातील अवैद्य धंदे विरोधात विविध सामाजिक संघटना तीव्र आंदोलन करणार

उमाप साहेब तालुक्यातील तरुणाईला बरबादी पासून वाचवा ; सुज्ञ नागरिकांची मागणी

भोकर / सिध्दार्थ जाधव / भोकर शहरासह तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून चालू असलेली प्रतिबंधित गुटखा, मटका, रसायन मिश्रित शिंदी,अवैद्य दारू विक्री आदींसह सर्व प्रकारचे अवैद्य धंदे बंद न केल्यास तालुक्यात विविध सामाजिक संघटना व पक्षाच्या वतीने तालुक्यातील अवैद्य धंद्या विरुद्ध रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नागोराव शेंडगे व सामाजिक संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत मुस्तापुरे यांच्या वतीने समाज माध्यमाद्वारे व प्रशासनास दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा भोकर शहरात गुटखा साठ्याचे छुपे गोदाम, होलसेल दुकान तर आहेतच यासह गोळीभांडरच्या नावाखाली खुलेआम गुटखा विक्री चालू असून प्रत्येक पान टपरी,हॉटेल, किराणा दुकानांवर गुटखा विक्री करण्यासाठी बिनधास्तपणे लडी सजवून ठेवलेल्या पाहावयास मिळत आहेत. तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण शहरातील बेकरीमध्ये अल्पोपहारासाठी मिळणाऱ्या वस्तू खरेदीसाठी जात नसून तो दूर्दैव असे पोलिसांच्या आशीर्वादाने मटका खेळायला जात असल्याचे दिसून येत आहे .शहरात काही ठिकाणी बेकरीच्या नावाखाली, राजकीय पक्षाच्या पदाच्या नावाखाली आणि शहरात कपडे इस्त्रीचे दुकान,हॉटेलसह जागोजागी टेबल लावून मटका घेतला जातो. शहरासह तालुक्यात अवैध दारू विक्रीने तर कहरच केला असून खेड्यापाड्यासह शहरात ठिकठिकाणी राजरोसपणे देशी–विदेशी दारू,रसायन मिश्रित शिंदी,हातभट्टी विक्री होत असल्याचे नागरिकांकडू पोलिसात वेळोवेळी करण्यात आलेल्या तक्रारी निवेदनावरून स्पष्ट कळते.शहरात वाढत असलेली अवैद्य वाहतूक,शहरापासून लांब अनेक ठिकाणी चालू असलेले पत्याचे डाव,आदी धंद्याकडे पोलिसांनी केलेली डोळेझाक कशासाठी ? अशा अवैद्य धंदे चालकांच्या डोक्यावर आशीर्वाद व पाटीवर शाबासकीची थाप कोणाची असेल असा सवाल उपस्थित केला जात आहे . सदरील अवैध धंदे बंद करून तालुक्यात चालू असलेले अवैद्य गोरखधंदे तात्काळ बंद न केल्यास

येथील यशवंत सेनेचे मराठवाडा प्रमुख, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, ओबीसी नेते मा.नागोराव शेंडगे व शिव भीम सेनेचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत मुस्तापुरे हे लोकशाही मार्गाने संबंधित विभागाच्या विरुद्ध जनआंदोलन करणार असल्याचा इशारा समाज माध्यम व निवेदनाद्वारे दिला आहे.

**उमाप साहेब तालुक्यातील तरुणाईला बरबादी पासून वाचवा ; सुज्ञ नागरिकांची मागणी**

नव्याने रुजू झालेले नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पकदभार स्वीकारल्यानंतर दुसर्याच दिवशी एका बैठकीत जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रमुखांना १५ ऑगस्ट पर्यंत अवैध धंदे बंद करा अन्यथा गाठ माझ्याशी असल्याची आदेशीत तंबी दिली.

या आदेशाने गुन्हेगारीला समर्थन देणाऱ्या पोलीस अधिकारी यांचे धाबे दणाणले असल्याचे चित्र दिसून येत असले तरीही भोकर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैद्य धंदे मात्र तेजीत सुरु आहेत.शहरासह तालुक्यात मटका, जुगार , अवैध रसायनमिश्रीत शिंदी,देशी– विदेशी दारू,गांजा , प्रतिबंधीत गुटखा आणि अवैध प्रवासी वहातूक आदी अवैध धंदे जोमाने सुरू असल्याच्या तक्रारी अनेकवेळा पोलीस निरीक्षक यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत . यामुळे पोलीस दलाची बदनामी होत असल्याने मिळालेल्या तक्रारीवरून भोकर पोलिसांकडून अवैध धंद्यांविरोधात कडक भुमीका घेतली जात नसुन मागील कांही दिवसांत रसायन मिश्रित शिंदी ने अनेक युवक मरण पावले आहेत. अशा अवैध व्यावसायिकांविरुद्ध धडक कार्यवाहीची मोहीम भोकर शहरासह तालुक्यात राबवून अवैध धंद्यांवर आळा घालावा व मटका ,जुगार , दारू, गुटखा आदी व्यसनाच्या आहारी जाऊन हजारो सुक्षिक्षित बेरोजगारांच्या पिढया बरबाद होण्यापासून उमाप साहेब वाचवाव्यात अशी आर्त हाक तालुक्यातील सुज्ञ नागरीकांतून होत आहे .

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)